मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 60 दिवसांत 300 कोटींचा कर वसूल!

## तीन महिन्यांत पाचशे कोटींचे उद्दिष्ट : सवलतींचा लाभ घेण्यासाठी तत्काळ कर भरणा करण्याचे महापालिकेचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने अवघ्या 60 दिवसांत तब्बल 308 कोटींचा कर वसूल करण्यात आला आहे. विविध कर सवलतींचा लाभ घेत 2 लाख 71 हजार 503 मालमत्ता धारकांनी आपला कर भरणा केला आहे. तसेच 30 जूनपर्यंत असलेल्या कर सवलतींचा लाभ घेऊन कराचा भरणा करावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.




शहरात 6 लाख 30 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. गतवर्षी विभागातर्फे राबविलेले विविध उपक्रम, जनजागृती, जप्ती मोहीम, नोटीसा, नळ कनेक्शन बंद करणे, थकबाकीदारांची वृत्तपत्रात नावांची यादी प्रसिद्ध करणे यासह सलग दुसऱ्यावर्षी महिलांच्या सिध्दी प्रकल्पा अंतर्गत बिलांचे घरपोच आणि वेळेत वाटप करण्यात आले आहे. याचीच फलनिष्पत्ती म्हणून मालमत्ता धारक कर संकलन कार्यालयासमोर अक्षरशः रांगा लावून कराचा उत्स्फूर्तपणे कर भरत असल्याचे चित्र प्रथमच दिसून येत आहे. यावरून शहरवासीयांनी शहर विकासात हातभार लावण्याची एक प्रकारे जबाबदारी स्वीकारली आहे.

6 लाख 30 हजार मालमत्तांपैकी 2 लाख 71 हजार 503 मालमत्ता धारकांनी 308 कोटी 42 लाख 31 हजार रुपयांचा कर जमा केल्याचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले.

### ऑनलाइन कर भरण्यास नागरिकांची पसंती

कर संकलन विभागाने सर्व सेवा सुविधा ऑनलाइनच्या उपलब्ध करून दिल्या आहेत. या सेवांचा मालमत्ता धारकांना प्रचंड मोठा फायदा होत असून करदाते दिवसेंदिवस 'हायटेक' होत आहेत. तसेच ऑनलाइन कर भरणाऱ्यांना नागरिकांना 5 टक्के सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे 2024-25 च्या आर्थिक वर्षांतील दोन महिन्यात 1 लाख 99 हजार 807 नागरिकांनी 218 कोटी 29 लाख 29 हजार रूपयांचा ऑनलाइन कराचा भरणा केला आहे.

### तीन महिन्यांत पाचशे कोटींचे उद्दिष्ट

गतवर्षी पहिल्या तिमाहीत साडेचारशे कोटी रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला होता. यामध्ये 35 कोटी उपयोग कर्ता शुल्काचे होते. तर 2024-25 या आर्थिक वर्षातील दोन महिन्यात 308 कोटी रुपयांचा कर वसूल करण्यात आला आहे. असे असले तरी कर संकलन विभागाने पहिल्या तिमाहीत पाचशे कोटींचा कर वसूल करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

### असा आला रुपया

ऑनलाइन- 218 कोटी 29 लाख
विविध ॲप- 8 कोटी 48 लाख
रोख-19 कोटी 32 लाख
धनादेशाद्वारे-12 कोटी 81लाख
एनइफटी -9 कोटी 21 लाख
इडीसी- 1 कोटी 71 लाख
आरटीजीएस-1 कोटी 72 लाख
डीडी-70 लाख 85 हजार
वाकड झोनमध्ये सर्वाधिक भरणा

### योजनांचा लाभ घेण्यासाठी तत्काळ कर भरावा

» गतवर्षी सिध्दी प्रकल्पा अंतर्गत महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचे वाटप करण्यात आले होते. करदात्यांनी कर भरण्यास मोठी गर्दी केली होती. त्यामुळे जूनमध्ये अनेक नागरिकांना कर भरता आला नाही. यंदा जूनच्या शेवटी गर्दी टाळण्यासाठी ज्यांना ज्यांना बिले मिळत गेली अशा नागरिकांना 31 मे पूर्वी कर भरण्याचे एसएमएसव्दारे आवाहन करण्यात आले होते. त्यामुळे काही नागरिकांचा सवलत योजनांबाबत गैरसमज झाला. मात्र, नागरिकांची एकाचवेळी गर्दी होऊ नये म्हणून बिले मिळताच कर भरावा, असे सांगण्यात आले होते. तसेच कर सवलत योजना बिलामध्ये नमुद केल्याप्रमाणे 30 जूनपर्यंत लागू असून नागरिकांनी महिन्याच्या अखेरपर्यंत वाट न बघता, रांगेत जास्त वेळ उभा राहण्याची वेळ येऊ नये, यासाठी योजनांचा लाभ घेऊन तत्काळ कराचा भरणा करावा.

# अनधिकृत होर्डिंगबाबत सोसायट्या रडारवर

## शहरात 24 होर्डिंग अनधिकृत : होर्डिंगधारक, होर्डिंगवरील जाहिरातदार व जागामालक अशा 72 जणांविरुद्ध गुन्हे दाखल

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील काही गृहनिर्माण सोसायट्यांनी इमारतींवर, सोसायटी आवारात होर्डिंग उभारले आहेत. असे विनापरवाना होर्डिंग उभारणाऱ्या सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा महापालिकेच्या आकाश चिन्ह व परवाना विभागाने दिला आहे.

मोशी येथे पंधरा दिवसांपूर्वी होर्डिंग कोसळले होते. त्यानंतर, महापालिकेने शहरातील होर्डिंगचे सर्वेक्षण केले. त्यात 24 होर्डिंग अनधिकृत आढळले होते. त्याप्रकरणी होर्डिंगधारक, होर्डिंगवरील जाहिरातदार व जागामालक अशा 72 जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. महापालिका अधिनियम आणि जाहिरात व फलक नियंत्रण नियमानुसार, खासगी जागेत होर्डिंग उभारण्यासाठी महापालिकेची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

मात्र, शहराच्या सौंदर्यात टिकविण्यासाठी सर्व अनधिकृत होर्डिंग काढले आहेत. परंतु, काही सहकारी गृहरचना संस्था आणि सोसायट्यांनी त्यांचा नियमित खर्च भागविण्यासाठी त्यांच्या मालकीच्या जागेत अथवा इमारतींच्या गच्चीवर होर्डिंग्ज उभारल्याचे आढळले आहेत. ज्या गृहनिर्माण संस्था परस्पर होर्डिंग्ज उभ्या करतील, त्यांच्यावर भारतीय दंड संहिता, महाराष्ट्र मालमत्ता विरुपनास प्रतिबंध अधिनियम, महापालिका अधिनियम आणि मुंबई प्रांतिक महापालिका नियमानुसार कारवाई करण्यात येईल. त्यासाठी महापालिकेस येणारा खर्च गृहनिर्माण संस्थांकडून वसूल केला जाईल. तसेच त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात येईल.



### या इमारतींना परवानगी नाही!

» होर्डिंग अधिसूचना मे 2022 नुसार, ज्या इमारतींना स्थैर्य प्रमाणपत्र अर्थात स्ट्रक्चर स्टॅबिलिटी सर्टिफिकेट नाही. ज्या इमारतींबाबत अधिनियम 1966 अन्वये महापालिका स्तरावर अथवा न्यायालयात कारवाई प्रलंबित असेल. ज्या इमारतीच्या मालकाला कायदेशीररीत्या काम थांबविण्याची नोटीस बजावण्यात आली आहे तसेच संपूर्ण इमारत अनधिकृत असेल. जी इमारत अंशतः किंवा पूर्णतः धोकादायक म्हणून घोषित करण्यात आली अथवा कायद्यान्वये तिला धोकादायक म्हणून नोटीस बजावली आहे.

# अल्पवयीन मुलाच्या आईला अटक

## पोर्श अपघात प्रकरणात अल्पवयीन मुलाच्या आईलाही घेण्यात आलं ताब्यात : पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे पोर्श अपघात प्रकरणात अल्पवयीन मुलाच्या आईला पुणे पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी ही माहिती दिली आहे. पुण्यात १९ मे रोजी एका अल्पवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेत पोर्श या कारने बाईक वरुन जाणाऱ्या तरुण-तरुणीला धडक दिली होती. या धडकेत अनिश अवधिया आणि अश्विनी कोस्टा या दोघांचा मृत्यू झाला. पोर्श कार पुण्यातील प्रतिथयश बांधकाम व्यावसायिकाचा मुलगा चालवत होता. आता या प्रकरणात पोलिसांनी या मुलाच्या आईला पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे.



### काय चौकशी केली जाण्याची शक्यता?

अल्पवयीन मुलाचे रक्ताचे नमुने बदलण्यात आल्याची बातमी समोर आली. त्या बदल्यात जे रक्त दिलं गेलं ते त्याची आई शिवानी अग्रवाल यांचं होतं का? त्यांनी कुणाला फोन करुन मुलाला वाचवण्यासाठी मदत मागितली, अपघाताचा कलंक कुणाला डोक्यावर घेण्यास सांगितलं या सगळ्या प्रश्नांची उत्तरं आता पोलीस त्यांना चौकशीदरम्यान विचारु शकतात. रक्ताच्या नमुन्यांमध्ये फेरफार केल्याचं प्रकरण समोर आल्यानंतर शिवानी अग्रवाल बेपत्ता झाल्या होत्या. मात्र पुणे पोलिसांनी त्यांना अटक केली. अपघातानंतर तीन दिवसांनी रॅप साँग गाणाऱ्या एका मुलाचा व्हिडीओ चर्चेत आला होता. हा व्हिडीओ सदर अल्पवयीन मुलाचा आहे हे समजून त्याला ट्रोल करण्यात आलं होतं. त्यानंतर शिवानी अग्रवाल कॅमेरासमोर आल्या आणि ढसाढसा रडत रॅप साँगमधला तो मुलगा माझा नाही असं सांगितलं होतं. त्यावेळीही त्या चर्चेत आल्या होत्या.

### रविवारी नेमकी काय घटना घडली?

१७ वर्षे आठ महिने वय असलेल्या बांधकाम व्यावसायिकाच्या अल्पवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेत ताशी १६० किमीच्या वेगाने पोर्श कार अनिश अवधिया आणि अश्विनी कोस्टा यांना धडक दिली. ही धडक इतकी जोरात होती की अश्विनीचा जागीच मृत्यू झाला. तर अनिशला रुग्णालयात नेण्यात आलं पण तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. अनिश अवधिया हा २४ वर्षांचा तरुण होता. पुण्यात त्याने इंजिनिअरिंग केलं होतं. तसंच मागच्या काही वर्षांपासून आयटी विभागात काम करत होता. तर अश्विनी कोस्टा त्याची चांगली मैत्रीण होती. दोघेही एकाच कंपनीत काम करत होते. मित्रांसह डिनरला गेले होते. हे दोघे बाईकवरुन निघाले त्यानंतर काही सेकंदातच भरधाव वेगात आलेल्या पोर्शने या दोघांना धडक दिली. ज्यात या दोघांचा मृत्यू झाला. या अपघातानंतर अनिश आणि अश्विनी या दोघांच्याही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### अधिष्ठाता सक्तीच्या रजेवर

बी.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात न घेता संस्थाप्रमुख म्हणून या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे त्यांना तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठविण्याची शिफारस समितीने सादर केलेल्या अहवालात केली आहे.

ससून रुग्णालयाते अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांनी डॉ. अजय तावरे यांच्या नियुक्तीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाचे आमदार सुनील टिंगरे यांच्या पत्रानंतर राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आंनी तावरे यांच्या नियुक्तीचे आदेश दिले होते. डॉ. तावरे यांच्यावर याआधी मूत्रपिंड प्रत्यारोपण आणि अमली पदार्थ तस्करी या प्रकरणी आरोप आहेत. तरी त्यांची न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

### अल्पवयीन मुलाच्या आईला अटक

» अल्पवयीन मुलाने पोर्श बेदरकारपणे चालवून दोन निष्पापांचा बळी घेतला. यानंतर या मुलाला पोलिसांनी अटक केली होती. मात्र त्याला १५ तासांत जामीन मिळाला. यावरुन समाजमाध्यमांमध्ये आणि समाजातही मोठ्या प्रमाणावर संताप व्यक्त झाला. त्यानंतर पुणे पोलिसांनी या प्रकरणी त्याच्या वडिलांना आणि आजोबांना अटक केली होती. त्यापाठोपाठ आता आज या मुलाच्या आईला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलं आली आहे. शिवानी अग्रवाल असं त्यांचं नाव आहे.

# पुण्यात धावतात तब्बल 25 पोर्शे स्पोर्ट कार

## आयटी पार्कमधील पायाभूत सुविधांची स्थिती दिवसेंदिवस खराब : 10 वर्षांत 37 कंपन्या बाहेर

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरात गेल्या साडेतीन वर्षांत प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) २५ पोर्शेकारची नोंद झाली आहे. शहरातील बांधकाम व्यवसायिक, उद्योजक तर काही कंपन्यांच्या मालकीच्या या कार असल्याचे दिसून येते. पोर्शे कार नंतर जॅग्वार, फेरारी आणि लॅम्बोर्गिनी या कार खरेदी करण्याकडे पुणेकरांचा कल असल्याचे दिसून येते.



कल्याणीनगर येथील ‘हिट ॲड रन ’ प्रकरणात अल्पवयीन आरोपीने पोर्शे स्पोर्ट कार बेदरकारपणे चालवून दोन संगणक अभियंत्यांना चिरडले. यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे पुणे शहर, राज्य नव्हे तर देशभर अपघाताबरोबरच पोर्शे स्पोर्ट कारमुळे चर्चेत आले. त्यामुळे पोर्शे स्पोर्ट कार शहरात किती आहेत याची माहिती पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात घेतली. साडेतीन वर्षांत २५ पोर्शे स्पोर्ट कारची खरेदी झाल्याचे दिसून येते. पोर्शे केरप्रमाणेच पुणेकरांना जॅग्वार, फेरारी व लॅम्बोर्गिनी या स्पोर्ट कारबरोबर शेकडो पुणेकरांनी ‘बीएमडब्ल्यू’ची खरेदी केल्याचे दिसून येते. शहरातील बांधकाम व्यवसायिक, विविध कंपन्यांनी, उद्योजकांनी हे स्पोर्ट कार खरेदी केले असले तरी मालकी फक्त कंपनीची आहे. या स्पोर्टकारची स्टेअरिंग मात्र, गर्भश्रीमंत कुटुंबातील लाडक्या बाळांच्या हाती आहे.

अनेक स्पोर्ट कारवर सामान्य वाहनांप्रमाणे नंबर प्लेट आहेत. त्यामुळे या वाहनांकडून जर अपघात झाला तर सहज पळ काढता येऊ शकते. कोणाच्याही लक्षात नंबर प्लेट राहू शकत नाही, असा काही जणांचा समज दिसतो. तर काहींनी ९९९९, ७७७, ९४९५, ६४६४, ००९९, ०००७ असे व्हीआयपी नंबर घेतले आहेत.

### मालकांची नावे गोपनिय

» पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात २०२१ मध्ये तीन पोर्शे स्पोर्ट कार घेतल्याची नोंद आहे. २०२२ मध्ये दहा, २०२३ मध्ये सात तर २०२४ मध्ये एप्रिल महिन्यांपर्यंत चार पार्शे स्पोर्ट खरेदी केल्याची नोंद आहे. २०२१, २०२२ व २०२४ यावर्षी कोणी, कोणी पोर्शे कार खरेदी केली यांची नावे आरटीओने देण्यास स्पष्टपणे नकार दिला. एम वाहन या मोबाईल अपवर त्यांची नावे शोधा असे आरटीओकडून सांगण्यात आले. मात्र, या अपवर ही महागडी खरेदी केलेल्या मालकांची नोंद नाही. दुचाकी व इतर. मोटारींची माहिती तत्काळ मिळत असल्याचे दिसून येते.

# खूशखबर! तूर्तास पाणी कपात नाही...

## दैनंदिन व साप्ताहिक आढावा घेत आहोत, नागरिकांनी जपून पाणी वापरावे : शेखर सिंह

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची तहान भागवणाऱ्या पवना धरणात सद्यःस्थितीत २३.९० टक्के इतका पाणीसाठा आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत तो किंचित अधिक आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सध्या नेहमीप्रमाणेच शहरातील पाणी वितरण सुरू राहणार असून पाणी कपातीचा अद्याप कोणताही विचार नसल्याचे ‘सकाळ’शी बोलताना स्पष्ट केले. मात्र, जून व जुलै महिन्यात पावसाने ओढ दिल्यास पाणी कपात नाकारता येणार नाही. त्यामुळे, पाणी जपून वापरणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

पुरेशा दाबाने व समान पाणी वितरणासाठी महापालिकेने २५ नोव्हेंबर २०१९ पासून दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला आहे. त्यासाठी शहरातील भागांनुसार वेळापत्रक निश्चित केले आहे. मात्र, उन्हाळ्यात पाण्याची मागणी वाढल्याने गृहनिर्माण सोसायट्यांना टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. मागणी वाढल्याने टँकरचे दर देखील काही प्रमाणात वाढले आहेत. त्यामुळे, सोसायट्यांचा अतिरिक्त खर्च वाढला आहे. महापालिकेकडून दिवसाआड होणारा पाणीपुरवठा पवना आणि आंद्रा धरणातून होत आहे. पवना धरणातून नदीत सोडलेले ५१० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी दररोज रावेत येथील बंधाऱ्यातून उचलले जाते. जलवाहिनीद्वारे ते निगडी प्राधिकरण सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रात नेले जाते. तिथे प्रक्रिया करून शहराच्या विविध भागांत वितरित केले जाते. तसेच आंद्रा धरणातून मंजूर शंभर एमएलडी कोट्यातील पाणी इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्यातून उचलले जाते.

त्यावर चिखली जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून वितरित केले जाते. सद्यःस्थितीत पवना धरणातून ५१० आणि एमआयडीसीकडून ३० असे ५४० एमएलडी पाणी घेतले जात आहे. निघोजे बंधाऱ्यातून दैनंदिन ८० ते ८५ एमएलडी पाणी घेतले जात आहे. अशा एकूण ६२० ते ६२५ एमएलडी पाण्यावर शहराची तहान भागवली जात आहे. मात्र, पवना धरणात ३१ मे अखेर २३.९० टक्के पाणीसाठा शिल्लक असल्यामुळे महापालिका आणखी पाणीकपात करणार, अशी भीती व्यक्त केली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर आयुक्तांशी संपर्क साधला असता त्यांनी पाणी कपातीचे नियोजन नसल्याचे स्पष्ट केले. तसेच आहे त्या स्थितीत पाणी वितरण सुरू राहणार असल्याचे सांगितले.



> आजच्या स्थितीत नेहमीप्रमाणेच पाणी वितरण सुरू राहणार आहे. पाणी कपातीचा अद्याप काही विचार नाही. हवामान खात्याच्या अंदाजानुसार १०७ ते १०८ टक्के पाऊस होणार आहे. जून- जुलैमध्ये पाऊस चांगला झाल्यास धरण लवकर भरते. मात्र, पावसाने ओढ दिल्यास जुलै-ऑगस्टमध्ये पाणीप्रश्न निर्माण होऊ शकतो. आम्ही दैनंदिन व साप्ताहिक आढावा घेत आहोत. सद्यःस्थितीत पाणीकपात होणार नाही. पण, नागरिकांनी जपून पाणी वापरावे.
> - शेखर सिंह, आयुक्त, महापालिका

**शहराशी संबंधित धरणांची 31 मेची स्थिती**

| धरण | पाणीसाठा (टक्केवारी) |
|---|---|
| पवना | २३.९० |
| आंद्रा | २९.२२ |
| वडीवळे | ४५.२१ |
| भामा आसखेड | १६.२२ |
| कासारसाई | २९.३३ |
| मुळशी | १५.०१ |

# शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रोचे 68 टक्के काम पूर्ण

## वाहतूक कोंडीमधून होणार सुटका, मेट्रो मार्गाचे काम येत्या दोन वर्षांत पूर्ण होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रोचे काम प्रगतिपथावर आहे. या मेट्रो मार्गाचे काम येत्या दोन वर्षांत म्हणजे २०२६ पर्यंत पूर्ण होणार आहे. सध्या त्याचे ६८ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे, वाकड, हिंजवडी परिसरातील नागरिकांना पुण्यात जाणे-येणे सोयीचे होणार आहे. सर्व कामे जलदगतीने सुरू आहेत. या मेट्रो मार्गामुळे नागरिकांची वाहतूक कोंडीमधून बऱ्याच अंशी सुटका होणार आहे.

शिवाजीनगर ते हिंजवडी-माण या तिसऱ्या मेट्रो मार्गाच्या कामासाठी वाकड आणि हिंजवडी (फेज १) या भागात गर्डर आणि खांबावर पिअर कॅप बसविण्याचे काम वेगाने सुरू आहे. माण-हिंजवडी-शिवाजीनगर हा २३ किलोमीटरचा मेट्रो मार्ग आहे. पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्याकडे या प्रकल्पाचे संनियंत्रण आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर टाटा समूहाने हे काम हाती घेतले आहे.

या प्रकल्पासाठी ८ हजार ३१३ कोटी रुपयांचा खर्च होणार आहे. सध्या हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गाचे खांब बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. स्थानक उभारणी सुरू आहे. रूळ बसविण्याचेही काम सुरू झाले आहे. त्याचे आतापर्यंत २५ टक्के काम पूर्ण झाले आहे.

शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रो मार्गाचे काम प्रगतिपथावर आहे. पीपीपी तत्त्वावर त्याची सुरुवात करण्यात आली आहे. सध्या ६८ टक्के काम पूर्ण झाले आहे. फेब्रुवारीपर्यंत काम पूर्ण करण्याचा मानस आहे, असे रिनाज पठाण म्हणाले.




**पुणे-हिंजवडीत 40 मिनिटांत**

» शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रोचा हा मार्ग पूर्ण झाल्यास पुणे आणि परिसरातून हिंजवडी आयटी पार्कमध्ये येणाऱ्या प्रवाशांच्या वेळेची बचत होणार आहे. अवघ्या ३५ ते ४० मिनिटांत या मार्गावर प्रवास करता येणार आहे.

**या स्थानकांचा समावेश**

» मेगापोलिस सर्कल, एम्बेसी क्वाड्रॉन बिझनेस पार्क, डोहलर, इन्फोसिस फेज २, विप्रो फेज २, पाल इंडिया, शिवाजी चौक, हिंजवडी, वाकड चौक, बालेवाडी स्टेडियम, एनआयसीएमएआर, रामनगर, लक्ष्मीनगर, बालेवाडी फाटा, बाणेर गाव, बाणेर, कृषी अनुसंधान, सकाळनगर, विद्यापीठ, आरबीआय, कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर आणि दिवाणी न्यायालय आदी.

# पब, बारवरील कारवाई का थंडावली?

## अनधिकृत पब, बारवर कारवाईचा धडाका मात्र गेल्या दोन-तीन दिवसांपासून हा धडाका थंडावल्याचे चित्र

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघातानंतर महापालिका आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने सुरुवातीला अनधिकृत पब, बारवर कारवाईचा धडाका लावला. मात्र गेल्या दोन-तीन दिवसांपासून हा धडाका थंडावल्याचे चित्र आहे. त्यामुळे 'कारवाई थंडावली का' अशी चर्चा सध्या नागरिकांत सुरू झाली आहे. प्रशासनाच्या कारवाईच्या आकडेवारीवरूनही हे चित्र स्पष्ट होत आहे.

महापालिकेच्या बांधकाम विभागाने गेल्या सहा दिवसांत ५५ अनधिकृत बार, पबवर कारवाई करून १ लाख ७ हजार हजार चौरस फुटाचे बांधकाम पाडण्यात आले. शहरात अद्यापही अनेक अनधिकृत रुफटॉप हॉटेल, बार असून, राजकीय पदाधिकाऱ्यांचा आश्रय असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यास टाळाटाळ का केली जात आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

अनेक ठिकाणी रहिवासी भागात रेस्टॉरंट, बार, पब सुरू झाल्याने तेथील रहिवाशांना गोंधळ आणि पार्किंगच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पण तक्रारी करूनही महापालिकेकडून कारवाई केली जात नव्हती. कल्याणीनगर येथील पोर्शे कारच्या अपघातामध्ये दोघांचा बळी घेतला. यातील अल्पवयीन आरोपीने पबमध्ये दारू पिल्याचे उघडकीस आल्याने संपूर्ण शहरात पब, बारमध्ये होणारे नियमांचे उल्लंघन, अनधिकृत बांधकामे याकडे महापलिका, पोलिस, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे लक्ष गेल्याने आता कारवाई सुरू झाली आहे.

कारवाईचा प्रस्ताव जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांच्याकडे सादर करण्यात आला होता. त्याला डॉ. दिवसे यांनी मान्यता दिल्याने परवाना सील करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागाने शहरात २२ मे पासून अनधिकृत बार, पब, रेस्टॉरंटवर कारवाई सुरू केली आहे. सुरुवातीला कारवाईचा जोर चांगला होता, पण आता कारवाई संथ झाली आहे. कोथरूड, बाणेर, बालेवाडी, कोंढवा, महंमदवाडी, हडपसर या भागांत अनेक अनधिकृत बार, पब आहेत. यामध्ये आमदार, माजी आमदार, माजी नगरसेवकांसह अन्य पदाधिकाऱ्यांची भागीदारी आहे.



> बांधकाम विभागाने जुन्या हद्दीतील झोन ४, ५, ६मध्ये कारवाई केली आहे. जवळपास ७० ते ८० टक्के अनधिकृत बार, रेस्टॉरंटवर कारवाई केली आहे. कारवाईचा जोर कमी झालेला नाही. शेड काढल्यानंतर पुन्हा हॉटेल सुरू करण्याचा प्रयत्न केला तर कारवाई केली जात आहे
>
> **- राजेश बनकर, अधीक्षक अभियंता.**

### कारवाई टाळण्यासाठी हॉटेल बंद

» कल्याणीनगर येथील घटनेनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नियमांचे उल्लंघन करणारे पब, बार सील करण्यात आले आहेत. महापालिकेनेही अनधिकृत बांधकाम पाडून हॉटेल बंद पाडले आहेत. पण ही कारवाई पुढचे एक-दोन आठवडे सुरू राहिली. तोपर्यंत हॉटेल बंद ठेवण्याबाबत प्रशासनातून 'टीप' मिळाल्यानंतर सध्या बार, हॉटेल बंद ठेवण्यात आले आहेत. कल्याणीनगर प्रकरणाची चर्चा बंद झाल्यानंतर स्थिती पूर्ववत होईल त्यानंतर हॉटेल सुरू केले जातील, अशीही चर्चा सुरू आहे.

### आतापर्यंत 63 हॉटेलचे परवाने सील

» याबाबत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. दिवसे म्हणाले, "गेल्या आर्थिक वर्षात नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी १९ मद्यालयांवर कारवाईचा प्रस्ताव राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून प्राप्त झाला होता. त्यानुसार आदेश काढण्यात आले. तसेच चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत ६३ मद्यालयांनी नियमांचे उल्लंघन केल्याने त्यांच्यावर कारवाईचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्यानुसार कारवाई करण्यात आली.

# शिरुरमध्ये पोर्शे पॅटर्न, चारचाकीने धडक बसल्याने एकाचा मृत्यू

## पोलिस पाटलाच्या अल्पवयीन मुलीच्या हातात चारचाकी; पिकउप चालविताना धडक

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या पुण्यातील हिट अँड रण प्रकरणाची देशभरात जोरदार चर्चा असुन एका बड्या बांधकाम व्यावसायिकाच्या मुलाने दारुच्या नशेत वेगाने आलिशान पोर्शे कार चालवून दोघांना उडवल्याने दुचाकीवरील तरुण-तरुणीचा मृत्यू झाला होता. शिरुर तालुक्यातही पोर्शे पॅटर्नचीचं पुनरावृत्ती झाली असुन एका अल्पवयीन पोलिस पाटलाच्या मुलीने दि 31 मे 2024 रोजी सकाळी 10: 15 च्या सुमारास मालवाहू पिकउप चालविताना दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीवरील तीसवर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला असुन दुसरा व्यक्ती जखमी झाला आहे.

याबाबत शिक्रापुर पोलिस स्टेशन येथे सतिश विठ्ठल मेमाणे (रा.वडगाव बांडे, ता. दौंड, जि. पुणे) यांनी फिर्याद दाखल केली असुन दि 31 मे 2024 रोजी सकाळी 10:15 च्या सुमारास मयत अरुण विठ्ठल मेमाणे व त्याचा मित्र महिंद्र राउसाहेब बांडे हे दोघेही स्प्लेंडर मोटार सायकल क्रं एम एच 12 व्ही आर 2072 घेवुन रोहित्राचे (TRANSFORMER) ऑइल आणण्यासाठी वडगावबांडे येथुन न्हावरे गावात निघाले होते. जाताना मोटार सायकल अरुण विठ्ठल मेमाणे हा चालवित होता. त्याच्या पाठीमागे महिंद्र राउसाहेब बांडे हा बसलेला होता. सदर मोटारसायकल अरणगाव (ता. शिरुर) येथे आली असताना त्यांच्या मोटार सायकलला अरणगावातील पिकअप नंबर एम एच 12 एस एफ 3439 यावरील चालकाने समोरासमोर धडक दिली. यात दुचाकी चालक अरुण मेमाणे याचा जागीच मृत्यू झाला तर महिंद्र बांडे हा जखमी झाला.



### मदत न करता पिकअप सोडुन गेले

» पिकअप क्रं एम एच 12 एस एफ 3439 अरणगावातील पोलिस पाटील संतोष लेंडे यांची अल्पवयीन मुलगी (अंदाजे वय 15) चालवत होती. तिच्या सोबत शेजारील सिटवर पोलिस पाटील संतोष निवृत्ती लेंडे बसले होते. सदर मुलीने तिच्या ताब्यातील सदरचा पिकअप हा जोरात भरधाव वेगात चालवुन मोटार सायकलला समोरुन ठोस देवुन सदरचा अपघात केला आहे. तसेच अपघात झाल्यानंतर मदत न करता ते दोघे ही पिकअप सोडुन तेथुन निघुन गेले. याबाबत शिक्रापुर पोलिस स्टेशन येथे मयत अरुण मेमाणे यांचा भाऊ सतिश मेमाणे यांनी फिर्याद दिली असुन अल्पवयीन मुलीचे वडील अरणगावचे पोलिस पाटील संतोष लेंडे यांच्यासह अल्पवयीन मुलीवर गुन्हा दाखल झाला असुन या घटनेचा पुढील अधिक तपास शिक्रापुर पोलिस करत आहेत.

### पोलिसांनी यावर अंकुश ठेवण्याची मागणी

» शिरूर तालुक्यातही पोर्शे पॅटर्न जोरात आहे. अल्पवयीन मुलांच्या हातात दुचाकी, ट्रॅक्टर अन चारचाकी गाड्या आहेत. त्यामुळे पुण्यासारखीचं दुर्दैवी घटना शिरुर तालुक्यात घडू शकते यांचा अंदाज 'दै. प्रभात' ने आधीच वर्तवला होता. त्यानंतर काही दिवसातच अरणगाव येथे अल्पवयीन मुलीच्या हातात मालवाहू पिकअप चालविण्यास दिल्याने एक जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. शिरुर तालुक्यात भविष्यात अजुन अशा घटना घडू नयेत यासाठी पोलिसांनी यावर अंकुश ठेवण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.